





दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com



खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here



वर्ष : ०५ | अंक : २८३, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, सोमवार, दि.२५ मे २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


## १० महिन्यांत मोदी सरकार कोसळणार, राहुल गांधींचा दावा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२४, नागपूर :** काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्र सरकार पुढील दहा महिन्यांत कोसळेल, असा दावा काँग्रेसच्या बैठकीत केला होता. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद फडणवीस यांनी त्यांच्यावर जोरदार निशाणा साधला आहे. नागपुरात आयोजित गोदाम लॉजिस्टिक पार्कचा शुभारंभ कार्यक्रमानंतर माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस राहुल गांधी यांना टोला लगावत म्हणाले की, 'मुंगेरीलाल के हसीन सपने ही मालिका यायची, राहुल गांधी यांच्या वक्तव्यातून त्याचाच प्रत्यय येतो.'





दरम्यान, नागपुरात उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक लॉजिस्टिक पार्कच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी नागपूरच्या औद्योगिक आणि आर्थिक विकासावर भर दिला. नागपूर आता देशातील महत्त्वाचे लॉजिस्टिक हब म्हणून उदयास येत आहे. या प्रकल्पामुळे विदर्भाच्या विकासाला मोठी चालना मिळणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, नागपूर एक लॉजिस्टिक हब म्हणून पुढे येत आहे. आज गोदाम लॉजिस्टिक पार्क याचा उद्घाटन केलेला आहे. अतिशय स्टेट ऑफ आर्ट अशा प्रकारची फॅसिलिटी तयार झालेली आहे. शंभर एकरहून जास्त जागेवर हे काम करण्यात आलेलं आहे आणि उद्योगाच्या क्षेत्राममध्ये, लॉजिस्टिकमध्ये, मॅन्युफॅक्चरिंगमध्ये खूप मोठा फायदा हा नागपूरला होणार आहे. गेल्या काही काळात जी लॉजिस्टिक पॉलिसी तयार केली आहे, त्याच्यामुळे नागपूर हे देशातला एक मोठे लॉजिस्टिक हब होत आहे. मोठ्या प्रमाणात लॉजिस्टिक पार्क तयार होत आहे आणि यामुळे लॉजिस्टिकची कॉस्ट कमी होणार आहे. आपल्याला जर ग्लोबल सप्लाय चैनचा भाग व्हायचा असेल, तर लॉजिस्टिक कॉस्ट कमी करणे हे महत्त्वाचं आहे आणि तेच काम आज या माध्यमातून करत आहोत असे मुख्यमंत्री म्हणाले.

दरम्यान, आता काम वेगाने करणं अत्यंत महत्त्वाचं आहे आणि ते अतिशय वेगाने काम झालेलं आहे. विशेषता समृद्धीचं एक्सटेन्शन आहे, यामुळे संपूर्ण पूर्व विदर्भ हा औद्योगिकदृष्ट्या अतिशय पुढारलेला होईल आणि त्यातून लॉजिस्टिकची कॉस्ट अतिशय कमी होईल. तसंच रोजगाराची निर्मिती खूप मोठ्या प्रमाणात होणार आहे, लॉजिस्टिक पार्कमध्ये सर्वात मोठा रोजगार असतो, त्यामुळे रोजगाराची संधी उपलब्ध झाली पाहिजे हा आमचा प्रयत्न आहे, असंही मुख्यमंत्री म्हणाले.

## ऑपरेशन मुस्कान अंतर्गत राहुरी पोलिसांची मोठी कामगिरी

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.२४, राहुरी :** राहुरी पोलीस स्टेशन आणि विश्रांतवाडी पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त कारवाईत १७ वर्षीय अल्पवयीन अपहरण झालेल्या मुलीची सुखरूप सुटका करण्यात आली असून आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे. पोलीस प्रशासनाच्या ऑपरेशन मुस्कान अभियानांतर्गत राहुरी पोलिसांनी आतापर्यंत तब्बल ११० मुलींचा शोध घेऊन त्यांना त्यांच्या पालकांच्या ताब्यात दिले असल्याची माहिती समोर आली आहे. याबाबत मिळालेली माहिती अशी की, पुणे जिल्ह्यातील विश्रांतवाडी येथील १७ वर्षीय अल्पवयीन मुलगी दि. २१ मे २०२६ रोजी दुपारच्या सुमारास राहत्या घरातून कोणालाही काहीही न सांगता निघून गेली होती. बराच शोध घेऊनही ती परत न आल्याने मुलीच्या पालकांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल केला होता. त्यानुसार विश्रांतवाडी पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक २४९/२०२६ अन्वये बीएनएस कलम १३७(२) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

या प्रकरणाची माहिती विश्रांतवाडी पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक विशाल माने यांनी राहुरी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांना दिली. त्यानंतर पोलीस निरीक्षक ठेंगे यांनी मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे तपासाची चक्रे वेगाने फिरवली. तपासादरम्यान आरोपी विकी शिवाजी अमोलिक (वय ३०, रा. बेलापूर ता. श्रीरामपूर, सध्या रा. वडनेर ता. राहुरी) हा संबंधित अल्पवयीन मुलीसह वडनेर परिसरात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.




त्यानुसार राहुरी पोलीस स्टेशनचे पोलीस कर्मचारी प्रमोद ढाकणे व उमेश शेख यांनी स्थानिक पोलीस पाटील यांच्या मदतीने वडनेर परिसरात शोधमोहीम राबवली. यावेळी एका पोल्ट्री फार्मवर आरोपी विकी अमोलिक हा अपहरण झालेल्या मुलीसह आढळून आला. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत मुलीची सुखरूप सुटका केली व आरोपीला ताब्यात घेतले. त्यानंतर आरोपी व पीडित मुलीला पुढील कारवाईसाठी विश्रांतवाडी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. सदर कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. पोलीस निरीक्षक संजय आर. ठेंगे यांच्या नेतृत्वाखाली पोहेकॉ प्रवीण बागुल, सुरज गायकवाड, राहुल यादव, प्रमोद ढाकणे, उमेश शेख, सतीश कुऱ्हाडे, नदीम शेख, सचिन धनाड, दरेकर व पोना वेताळ यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

## पंढरपूर व्हीआयपी दर्शन नावालाच बंद असल्याने भाविकांतुन संताप

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२४, पंढरपूर :** महाराष्ट्राची दक्षिण कशी समजल्या जाणाऱ्या पंढरपूर येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात सध्या पुरुषोत्तम मास अधिक मास सुरू असल्याने दररोज लाखो भाविक दर्शनासाठी येत आहेत. या भाविकांच्या सोयी सुविधांकडे मंदिर समितीचे पूर्णतः दुर्लक्ष झाल्याचे दिसून येत आहे. प्रत्यक्षात कसल्याही प्रकारची सुविधा मंदिर समितीने भाविकांना दिलेली नाही.



दर्शन बारी असो मुखदर्शन राग असतो किंवा व्हीआयपी दर्शनासाठी काढलेला कागदावरचा आदेश असो याचाच एक भाग म्हणून आज मंदिरात एकच गोंधळ उडाला. पंढरपूर नगरपालिकेचे माजी नगरसेवक यांची मंदिरात दर्शनासाठी अडवणूक करण्यात आली. तर दुसरीकडे मंदिर समितीचे सदस्याकडून १० ते १२ लोकांना घुसखोरी करण्यास कर्मचाऱ्यांकडून सहकार्य केले गेले. दरम्यान हा संपूर्ण प्रकार घडत असताना एका पत्रकाराने शूटिंग काढण्याचा प्रयत्न केला असता बीव्हीजी कंपनीच्या कर्मचाऱ्याकडून मोबाईल हिसकवण्याचा प्रकारही घडला आहे.

या संपूर्ण प्रकारामुळे मंदिर समितीने अधिकमासामध्ये भाविकांसाठी कसल्याही प्रकारची सुविधा केली नसल्याचे दिसून आले तर व्हीआयपी दर्शन बंद करण्याचा आदेश फक्त कागदावर असल्याचेही निदर्शनास आले आहे. याकडे आता जिल्हाधिकाऱ्यांनीच लक्ष घालण्याची मागणी होत आहे. कारण सध्या मंदिर समितीचे व्यवस्थापक व कार्यकारी अधिकारी हे दोघेही रजेवर आहेत असे समजते. त्यामुळे आता स्वतः जिल्हाधिकारी यांनी भाविक भक्तांच्या सोयी सुविधेकडे लक्ष देण्याची मागणी केली जात आहे.

## वाशीच्या ब्रिजवर बसने घेतला अचानक पेट, भीषण अग्नितांडव

**दि.२४, नवी मुंबई :** नवी मुंबईत खासगी बसला आग लागल्याची घटना घडली. या आगीत बसचे मोठे नुकसान झाले आहे. आगीच्या घटनेचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. या व्हिडीओत आगीचे आणि धुळीचे मोठमोठे लोळ बघायला मिळत आहेत. व्हायरल होणाऱ्या व्हिडीओतून आग किती भीषण होती याची प्रचिती येत आहे. सुदैवाने या आगीच्या घटनेमुळे कोणत्याही प्रकारची जीवितहानी झालेली नाही. आगीची माहिती अद्याप अधिकृतपणे समजू शकलेली नाही. पण जास्त तापमानामुळे बसच्या तापमानात वाढ झाली आणि त्यातून तिला आग लागल्याची शक्यता वर्तवली जात आहे.



वाशीत मुंबईहून पुण्याच्या दिशेला जाणाऱ्या मार्गावर आग लागल्याची घटना घडली आहे. वाशीच्या ब्रिजवर ही घटना घडली आहे. उन्हामुळे बसचे तापमान वाढले आणि त्यामुळे ही आग लागल्याची चर्चा आहे. पण याबाबत अधिकृत अशी कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही. दरम्यान, ही घटना नेमकी कशी घडली? याबाबत पोलिसांकडून तपास केला जात आहे. पोलीस तपासातून याबाबत सविस्तर माहिती समोर येण्याची शक्यता आहे.

**अग्निशामक दलाकडून शर्थीचे प्रयत्न :** आगीच्या घटनेबाबत माहिती मिळताच अग्निशामक दलाची गाडी घटनास्थळी दाखल झाली. अग्निशामक दलाच्या पथकाने शर्थीने प्रयत्न करत आगीवर ताबा मिळवण्याचा प्रयत्न केला. यामध्ये अग्निशामक दलाच्या जवानांना यश देखील आलं. आग विझवल्यानंतर जवानांनी कुलिंगचे काम केले. यानंतर आग पूर्णपणे आटोक्यात आली. पण घटनेत बसचे प्रचंड नुकसान झाले आहे. बस या दुर्घटनेत जळून खाक झाली आहे.

**घटनेनंतर परिसरात खळबळ :** दरम्यान, बसला आग लागल्याची घटना घडल्यानंतर परिसरात मोठी खळबळ उडाली. अनेकांनी या घटनेवर चिंता व्यक्त केली. यावेळी रस्ताने जाणाऱ्या इतर प्रवाशांनी थांबून पोलीस आणि अग्निशामक दलाला माहिती दिली. तर काही प्रवाशांनी मोबाईलमध्ये घटनेचे फोटो आणि व्हिडीओ घेतले. हेच फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले. या घटनेच्या व्हिडीओमध्ये नागरिकांमध्ये कशाप्रकारे भीती निर्माण झाली होती ते त्यांच्यातील संभाषणातून जाणवत आहे. अर्थात घटनादेखील तितकीच भीषण होती.

## मुंबईकरांचा लाडका वडापाव महागला !

### सर्व सामान्यांना दरवाढीची झळ सोसावी लागणार

**अक्षराज : संजय पंडित**



**दि.२४, मुंबई :** आखाती देशातील युद्धाचा मोठा फटका आता भारतात देखील बघायला मिळत आहे.गेल्या काही दिवसात महागाईने उच्चांक गाठल्याचे चित्र सर्वत्र पहावयास मिळत आहे. त्यामध्येच आता सर्व सामान्य मुंबईकरांच्या पाहिल्या पसंतीचा लोकप्रिय वडापावसाठी देखील आता अधिकचे पैसे मोजावे लागणार आहेत. गॅस पाठोपाठ आता खाद्यतेलाच्या वाढलेल्या किमती मुळे सर्वच बेकरी उत्पादनामध्ये साधारणता ५ ते २५ टक्क्यांची दरवाढ करण्यात आल्याने सगळीकडे लागणाऱ्या पावाच्याही किमतीत वाढ झाली आहे,परिणामी भाजी पाव,मिसळ पाव आणि सर्व सामान्यांना परवडणारा आवडता वडा पाव देखील महागला आहे. इराण आणि अमेरिका युद्धाचा मोठा फटका भारतात बसत आहे. अनेक गोष्टी महागल्या आहेत. पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीत वाढ होत आहे. ऊर्जेचे संकट आहे. एलपीजी गॅस सिलेंडरचा तुटवडा असून व्यावसायिक सिलेंडरच्या किमतीमध्ये वाढ झाली. त्यामध्येच कच्च्या तेलाच्या किमतीमध्येही वाढ झाली. दहा दिवसात तिसऱ्यांदा पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीत वाढ झाली. सर्वसामान्य नागरिकांना मोठा दणका बसत आहे. केंद्र सरकार एका मागून एक मोठे निर्णय घेताना दिसत आहे. पगार वाढ नाही पण महागाई वाढत असल्याने सर्वसामान्य लोक त्रस्त झाली. पेट्रोल आणि डिझेलसोबतच एलपीजी गॅसच्या किमतीमध्येही वाढ झाली. काही जिल्ह्यामध्ये पेट्रोल आणि डिझेलचे साठे संपले आहेत. मोठा तुटवडा निर्माण झाला. जर पुढील काही दिवस हे युद्ध सुरू राहिले तर भारतासह अन्य देशांमध्ये हाहाकार उडू शकतो. केंद्र शासनाकडून परिस्थिती नियंत्रणात ठेवण्याकरिता प्रयत्न केली जात आहेत. एलपीजी गॅसचा तुटवडा, त्यात व्यावसायिक सिलेंडरच्या किमतीत वाढ ज्यामुळे हॉटेल व्यवसायिक पदार्थांच्या किमतीमध्ये वाढ करत आहेत. त्यामध्येच आता मुंबईकरांना वडापावकरिता अधिकचे पैसे माजावे लागणार आहेत. मुंबईकरांकरिता वडापाव अत्यंत जवळचा विषय आहे. धावपळीत तुम्ही चालत चालत देखील आरामात वडापाव खाऊ शकता.

परंतु आता थेट या वडापावच्या किमतीत वाढ झाल्याने मुंबईकरांच्या खिशाला मोठी झळ बसणार आहे. मुंबईकरांना आता बटाटा वडापावसाठी २० ते २५ रुपये मोजावे लागणार आहेत. व्यवसायिक गॅस सिलिंडर, खाद्यतेल आणि पावाचे दर वाढल्याने वडापावचे दरही पाच ते सात रूपयांनी वाढणार आहेत. पावच्याही किमतीत वाढ झाली आहे.

मुंबईतील विविध भागात बटाटा वडापावचे दर वेगवेगळे आहेत. दादरला २० ते २५ रुपयांमध्ये वडापाव मिळतो. आता त्यात वाढ होणार. इराण आणि अमेरिका युद्धाच्या झळा मुंबईच्या वडापाव पर्यंत पोहोचल्या आहेत. जर हे युद्ध अजून काही काळ चालले तर परिस्थिती अधिक बिकट होऊ शकते. खाण्याच्या वस्तूंमध्ये मोठी वाढ होत आहे. सर्वसामान्य मुंबईकरांचा वडापाव देखील आता महाग होतोय.

## चार निरपराध महिलांचा बळी घेणाऱ्या टी-२ वाघिणीला पवनपार च्या जंगलात जेरबंद



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२४, चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्ह्यातील सिंदेवाही वनपरिक्षेत्रातील गुंजेवाही जंगलात तेंदूपत्ता संकलनासाठी गेलेल्या चार महिलांचा बळी घेणाऱ्या हल्लेखोर टी-२ वाघिणीला अखेर वनविभागाने जेरबंद करण्यात यश मिळविले आहे. शनिवारी रात्री झालेल्या या कारवाईत वनविभागाच्या मोठ्या शोधमोहिमेला यश मिळाले असून, परिसरातील नागरिकांनी काही प्रमाणात सुटकेचा नि:श्वास सोडला आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील गुंजेवाही जंगलात २२ मे रोजी टी-२ वाघीणीने तेंदूपत्ता संकलनासाठी गेलेल्या १३ महिलांच्या गटावर हल्ला केला होता. दबा धरुन बसलेल्या वाघीणीच्या हल्ल्यात १३ पैकी चार महिलांचा मृत्यू झाला. वाघाच्या हल्ल्यात एकाच वेळी एवढ्या मोठ्या संख्येने मानवी हानी होण्याची ही महाराष्ट्रातील पहिलीच घटना असल्याचं सांगण्यात आलं. या हल्ल्यानंतर गुंजेवाही गावात भीतीचं वातावरण निर्माण झालेलं. नरभक्षक वाघाचा बंदोबस्त वनविभागाने करावा अशी मागणी केली जात होती. वाघीणीच्या हल्ल्याची ही घटना गुंजेवाही-पवनपार या मार्गावर असलेल्या खैरीचक परिसरातील जंगलात घडल्यानंतर वनविभागाने वाघीणीला पकडण्यासाठी आवश्यक त्या सर्व परवानग्या घेतल्या. त्यानंतर ट्रॅप रचण्यात आला.

वनविभागाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पवनपार बीट कक्ष क्रमांक २८२ मध्ये ही कारवाई करण्यात आली. संबंधित वाघिणीला बेशुद्ध करून पकडण्याचे आदेश प्राप्त होताच विशेष पथकाने जंगल परिसरात युद्धपातळीवर शोधमोहीम सुरू केली. विशेष म्हणजे, कारवाईच्या वेळी वाघिणीसोबत तिचे बछडे नसल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. त्यामुळे वाघिणीच्या हालचाली व तिच्च्या बछड्यांच्या सहास्थितीबाबत वनविभाग स्वतंत्र तपास करणार असल्याचे समजते. शनिवारी रात्री सुमारे सव्वासात वाजताच्या दरम्यान ट्रॅन्क्युलायझर डार्टद्वारे एका वाघावर वेध घेण्यात आला. सुरुवातीला अंधारामुळे डार्ट लागलेला प्राणी हल्लेखोर वाघीण आहे की अन्य वाघ, याबाबत संभ्रम निर्माण झाला होता. मात्र, त्यानंतर वनविभागाने पडताळणी केली असता ती टी-२ वाघीण असल्याचे स्पष्ट झाले. तसेच हीच वाघीण गुंजेवाहीतील चार महिलांच्या मृत्यूस कारणीभूत असल्याचे निष्पन्न झाले आहे. यानंतर ८ वाजताच्या सुमारास जेरबंद करण्यात आले. वाघिणीला जेरबंद करण्यात आल्याची बातमी गावात वाऱ्यासारखी पसरली. गावकऱ्यांनी या कारवाईबद्दल समाधान व्यक्त केलं आहे.

अक्षराज






## दुर्मीळ खनिजांची शर्यत

एके काळी जगातील महासत्तांची लढाई तेलासाठी होत होती. पश्चिम आशियातील तेलसाठ्यांवर नियंत्रण मिळवण्यासाठी युद्धे झाली, सरकारे बदलली आणि आंतरराष्ट्रीय राजकारणाची दिशा ठरली; पण आता जग एका नव्या युगात प्रवेश करत आहे. आजची लढाई तेलासाठी नाही, तर 'रेअर अर्थ मिनरल्स' म्हणजेच दुर्मीळ खनिजे, सेमीकंडक्टर चिप्स आणि उच्च तंत्रज्ञानासाठी आवश्यक संसाधनांवर नियंत्रण मिळवण्यासाठी सुरू झाली आहे. ही लढाई सध्या 'शांततेत' सुरू आहे, पण तिचे परिणाम भविष्यातील जागतिक सत्ता-संतुलन ठरवू शकतात.

हे 'दुर्मीळ खनिजे' प्रकरण नक्की काय आहे? ही खनिजे म्हणजे पृथ्वीवर फार कमी प्रमाणात आढळणारी खनिजे असा अनेकांचा समज असतो. प्रत्यक्षात असे नाही. ही खनिजे पूर्णपणे दुर्मीळ नाहीत; पण ती आर्थिकदृष्ट्या उपयुक्त स्वरूपात कमी ठिकाणी आणि गुंतागुंतीच्या प्रक्रियेनंतर मिळतात. निओडिमियम, लँथॅनम, डिस्प्रोसियम, सेरियम अशी १७ महत्त्वाची मूलद्रव्ये या गटात मोडतात. आधुनिक इलेक्ट्रॉनिक्सपासून लष्करी तंत्रज्ञानापर्यंत या खनिजांचा वापर अपरिहार्य बनला आहे.

आधी या मातीकडे किंवा खनिजांकडे कुणी ढुंकूनही पाहत नव्हतं. पण जेव्हापासून स्मार्ट मोबाईल, कम्प्युटर, इंटरनेट, ड्रोन, इलेक्ट्रिक गाड्या (ईव्ही) आणि आता कृत्रिम बुद्धिमत्ता या गोष्टींचा बोलबाला सुरू झाल्यापासून या खनिजांना सोन्यापलीकडचा भाव आलाय. काही दशकांपूर्वीपर्यंत ज्या खनिजांकडे फारसे लक्ष दिले जात नव्हते ते १९८० नंतरची संगणक क्रांती, स्मार्टफोन, उपग्रह, आधुनिक युद्धविमान आणि आता कृत्रिम बुद्धिमत्ता या सर्वांच्या मागे दुर्मीळ खनिजांची मोठी साखळी कार्यरत असते. सोप्या भाषेत आधुनिक ड्रोन, रडार प्रणाली, क्षेपणास्त्रे आणि उपग्रह तर या चिप्सशिवाय अक्षरशः निष्प्रभ ठरतील. आज युद्धभूमीवर केवळ सैनिकांची संख्या महत्त्वाची राहिलेली नाही; तर कोणाकडे अधिक वेगवान डेटा प्रक्रिया करणारी चिप्स आणि अचूक सेन्सर प्रणाली आहे, यावर विजय ठरू लागला आहे. मग ते युक्रेन-रशिया युद्ध असो किंवा इराण-अमेरिका- इस्रायल संघर्ष.

याच कारणामुळे सेमीकंडक्टर उद्योगाला 'नव्या युगातील तेल' म्हटले जाते. २०२० मध्ये कोविड महामारी दरम्यान चिप्सची टंचाई निर्माण झाली, तेव्हा अमेरिका, युरोप आणि जपानला जाणवले की, आधुनिक अर्थव्यवस्था काही मोजक्या देशांतील उत्पादनांवर अवलंबून आहे. विशेषतः तैवानची 'तैवान सेमिकंडक्टर मॅन्युफॅक्चरिंग कंपनी' (TSMC) आणि दक्षिण कोरियाची 'सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्स' यांच्याकडे जागतिक उत्पादनाचा मोठा हिस्सा केंद्रित आहे. त्यामुळे तैवानभोवती वाढणारा चीन-अमेरिका तणाव हा केवळ भौगोलिक प्रश्न नसून ते खरे तर एक 'चिप युद्ध' आहे. दुर्मीळ खनिजांच्या क्षेत्रात चीनने अत्यंत दूरदृष्टीने काम केले. १९९२ मध्ये चीनचे तत्कालीन नेते डेंग जियापिंग म्हणाले होते, 'मध्यपूर्वेकडे तेल आहे, तर चीनकडे दुर्मीळ खनिजे आहेत.'

पुढील तीन दशकांत चीनने जगातील दुर्मीळ खनिजांचे उत्खनन, प्रक्रिया उद्योग आणि पुरवठा साखळीवर मजबूत पकड निर्माण केली. २०१० मध्ये चीन आणि जपान यांच्यात समुद्री वाद निर्माण झाल्यानंतर चीनने जपानकडे जाणाऱ्या दुर्मीळ खनिजांच्या निर्यातीवर निर्बंध घातले. हा जगासाठी मोठा इशारा होता. भविष्यात तंत्रज्ञान आणि संरक्षण क्षेत्रात चीनवरील अवलंबित्व धोकादायक ठरू शकते, हे ओळखून अमेरिकेने ऑस्ट्रेलिया, कॅनडा आणि आफ्रिकेत पर्यायी पुरवठा साखळी निर्माण करण्यास सुरुवात केली.

आफ्रिका आणि लॅटिन अमेरिका आता या नव्या 'खनिज राजकारणा'चे केंद्र बनले आहेत. काँगोमधील कोबाल्ट आणि लॅटिन अमेरिकेतील लिथियमवर महासत्तांचे लक्ष आहे. परंतु, इतिहास सांगतो की, नैसर्गिक संपत्ती असलेल्या अनेक गरीब देशांना संपन्नतेपेक्षा संघर्षच अधिक मिळाला. शिवाय, या खनिजांच्या उत्खननाची पर्यावरणीय किंमत मोठी आहे. इथेच विकसित देशांवर 'पर्यावरणीय दुटप्पीपणा'चा आरोप होतोहरित ऊर्जेची भाषा करायची आणि आवश्यक खनिजांचे प्रदूषणकारी उत्खनन मात्र आफ्रिका किंवा आशियात करायचे.

आज अमेरिका आणि चीन यांच्यातील संघर्ष हा फक्त व्यापार युद्ध राहिलेला नसून, तो भविष्यातील जागतिक सामरिक नियंत्रणाचा संघर्ष बनला आहे. याच पार्श्वभूमीवर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांनी २०२२ मध्ये 'चिप्स ॲण्ड सायन्स ॲक्ट' (चिप्स अँड सायन्स) लागू केला. अब्जावधी डॉलर्सची मदत देणाऱ्या या कायद्याचा उद्देश चीनवरील तांत्रिक अवलंबित्व कमी करून प्रगत चिप्सचे उत्पादन अमेरिकेतच वाढवणे हा आहे. यासोबतच अमेरिकेने प्रगत एआय चिप्स आणि अत्याधुनिक उत्पादन तंत्रज्ञान चीनला निर्यात करण्यावर कठोर निर्बंध लादले आहेत.

# झुरळाची 'भुरळ'

'एक मच्छर आदमी को हिजडा बना देता है' हा नाना पाटेकर यांचा फिल्मी डायलॉग कधी काळी फारच गाजला होता. गेल्या काही दिवसांपासून एका 'झुरळा' ने चांगलाच गदारोळ माजला आहे. त्याचे झाले असे देशाच्या सर्वोच्च न्यायव्यवस्थेकडे एका वकिलाने मला वरिष्ठ वकील म्हणून संबोधले जावे यासाठी धाव घेतली खटल्याची सुनावणी होत असतांना कोणताही संदर्भ नसतांना देशाचे सरन्यायाधीश सुर्यकांत यांनी भलतेच विषयांतर करत तरुणाईवर त्याच्या बेरोजगारीवर घसरले.

त्यावेळी भाष्य करतांना त्यांनी बेरोजगार तरुणांना झुरळाची ऊपमा तर दिलीच पण परजिवी देखील म्हटले. त्याच बरोबर या बेरोजगारांना नोकरी लागत नाही म्हणून काही बेरोजगार तरुण झुरळांसारखे असतात, जे नंतर माध्यम, सोशल मीडिया आणि माहिती अधिकार कार्यकर्ते बनून व्यवस्थेवर हल्ला करतात. असे वादग्रस्त वक्तव्ये केली सहाजिकच या विधानामुळे देशभरातील बेरोजगार युवक, पत्रकार आणि आरटीआय कार्यकर्त्यांमध्ये संताप व्यक्त करण्यात आला ऊलट सुलट प्रतिक्रिया ऊमटत आहे. त्यानंतर त्यांनी सारवासारव करत माध्यमांच्या एका घटकाने आपल्या तोंडी टिप्पणीचा चुकीचा अर्थ लावून ती देशातील तरुणांच्या विरोधात असल्याचे भासवल्याचे सांगत तीव्र नाराजी आणि खेद व्यक्त केला. मुळात सरन्यायाधीशांनी असे विधान करावे असा कुठलाच संदर्भ नव्हता कि औचित्य ही नव्हते. गेल्या काही वर्षांपासून न्यायव्यवस्थेचे देखील राजकियीकरण झाले आहे का आणि न्यायव्यवस्था सरकारची भाषा बोलु लागली आहे का असा प्रश्न पडतो. अगोदरच शिक्षणाची डिग्री हातात घेऊन नोकरी व्यवसायासाठी वणवण भटकणाऱ्या युवकाबाबत सहानुभूती दाखविण्याऐवजी मीठ चोळले जात आहे ते देखील न्यायव्यवस्थेकडुन हे अतिशय दुर्दैवी आहे. त्या ऐवजी बेरोजगारीच्या समस्येकडे राज्यव्यवस्थेचे लक्ष वेधले असते तर ते अधिक योग्य ठरले असते.

आजचा युवक आळशी ही नाही कि ऐतखाऊ देखील नाही त्याच्या जखमेवर अशा पद्धतीने मीठ चोळले ते देखील देशाच्या सर्वोच्च न्यायव्यवस्थेकडुन हे तरुणाईला रुचणारे नाहीच, आजची तरुणाई टेक्नोसॅव्ही आहे, लीलया आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणारी आहे, याच युवाशक्ती कडे देशाचा डिव्हिडंड म्हणुनही पाहिले जाते. अशाच एका अभिजित दिपके या तरुणाने सोशल मीडिया वर चक्क 'कॉक्रोच जनता पार्टी' ची स्थापना केली.अभिजीत दिपके हा हिंगोलीतील तरूण अमेरिकेत बोस्टन या शहरात रहातो तो सामान्य कुटुंबातील आहे. काही काळ त्याने 'आप' पक्षाचे काम केले आहे,त्याने पत्रकारितेचा कोर्स केला आहे. सरन्यायाधीशांनी केलेले भाष्य त्यांना चांगलेच लागले त्यातुनच त्यांनी' कॉक्रोच जनता पक्षाची स्थापना केली. या पक्षाचा अजेंडा, झेंडा, पक्षात प्रवेशासाठी लागणारी योग्यता जाहीर केली.

१) देशाचे सरन्यायाधीश निवृत्ती नंतर कुठलेही पद स्विकारणार नाहीत

२) एक जरी वैध मतदार मतदानापासून वंचित राहिला तर त्याची जबाबदारी मुख्य निवडणूक आयुक्तांवर असेल आणि त्यांच्या वर युएपीए अंतर्गत खटला चालविला जावा.

३) महिलांना पन्नास टक्के आरक्षण.

४) अदाणी अंबानी गोदी मिडिया चे लायसन्स रद्द करुन अँकरांच्या बँक अकाऊंट ची चौकशी करणार.

५) पक्षांतर करणाऱ्या आमदार खासदारांना पुढील वीस वर्षे निवडणूक लढवित येणार नाही. हे या पक्षाचे घोषणापत्र आहे तर पक्षात प्रवेश घेण्यासाठी ईच्छुक आळशी, बेरोजगार, चोवीस तास ऑनलाईन असले




पाहिजे ही पात्रता ठरविण्यात आली आहे. हा पक्ष प्रत्यक्ष जमीनीवरील नाही तर केवळ समाजमाध्यमातच स्थापन करण्यात आला आहे, मात्र अगदी अल्पावधीतच या पक्षाने फॉलोअर्सच्या संख्येत जगातील सर्वात मोठा राजकीय पक्षासह सर्वांना मागे टाकले. कोट्यावधी फॉलोअर्स प्रतिसाद देत आहेत. यामुळे समाजमाध्यमावरील पक्षाचे खाते बंद करण्यात आले मात्र पक्षाकडून कॉक्रोच ईज बॅक हे दुसरे खाते सुरू करण्यात आले याला देखील समाजमाध्यमातुन ऊस्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. हा मिळणारा प्रतिसाद अनाकलनीय असला तरी अनपेक्षित नाही. प्रस्थापितांकडुन निराशा हाती पडल्याने चहूबाजूंनी झुरळा सारखे अनेकजण या पक्षाशी जोडले जात आहेत. ही आजच्या जेन झी ची ताकद आहे. आता नेहमीप्रमाणे कॉक्रोच पक्षाला झुरळा सारखे बाजुला करण्यासाठी यंत्रणा, ट्रोल आर्मी कामाला लागल्या आहेत.व्यक्तिशः अभिजीत, त्याच्या कुटुंबीयांना लक्ष केले जात आहे.तरूणांमधील, जनतेमधील अस्वस्थतेला या निमित्ताने मोकळी वाट मिळाली आहे. वास्तविक सरकार, सर्व प्रस्थापित राजकीय पक्ष यांनी याचा गांभीर्याने विचार करावा. कॉक्रोच जनता पक्षाची काहींना भुरळ घातली आहे तर काहींना धडकी भरली आहे आणि झुरळाला चिरडण्यासाठी यंत्रणाची धावपळ होत आहे. मात्र दडपशाही, दमनगिरी करुन प्रश्न सुटत नाहीत आणि ते लोकशाहीत योग्य देखील नाही. बेरोजगारी, महागाई, भ्रष्टाचार या समस्या आहेत हे मान्य न करता मुळ प्रश्नांना किती काळ बगल देत रहाणार?. सरकार विरोधात व्यक्त व्हायचेच नाही का?. अशी दडपशाही करण्याऐवजी करोडोंना झुरळाची भुरळ का पडली याचा गांभीर्याने विचार होणे गरजेचे आहे.

**- अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**९१५८४९५०३७**

# जीर्ण मंदिरांचा जीर्णोद्धार श्रीमंत मंदिरांनी करावा !

'आजमितीला अनेक गावांत शाळा नसल्याने तेथील मुले शिक्षणापासून वंचित असताना, पुरेशा आरोग्यसेवा नसल्यामुळे लोकांचे प्राण जात असताना भारतातील मंदिरे मात्र श्रीमंत होत आहेत' यासारखे ज्ञान कोणत्या तरी महापुरुषाच्या नावावर खपवून व्हाट्सअप संदेशाद्वारे अधूनमधून समाजात पसरविले जाते. देवाधर्मावर श्रद्धा असणाऱ्यांना भ्रमित करणारे असे संदेश तयार करणाऱ्यांना शाळा आणि दवाखाने बांधणे हे मंदिराचे काम आहे की सरकारचे याबाबतचे ज्ञान नसावे का ? मतदान करणे हे जसे आपले कर्तव्य आहे तसे मतदान करून योग्य प्रतिनिधी निवडणे हा आपला अधिकारही आहे, या अधिकारापासून कोणताही भारतीय नागरिक वंचित राहू नये यासाठी अगदी दुर्गम भागात शे-दोनशे लोकसंख्या असलेल्या गावांतही यंदा मतदान केंद्रे उभारण्यात आली होती. एका ठिकाणी तर एका व्यक्तीसाठी मतदान केंद्र उभारण्यात आल्याचे वृत्त वाचनात आले. जे सरकार मतांसाठी इतक्या दुर्गम जागी पोहोचू शकते ते सरकार त्या भागात शाळा का बरे बंधू शकत नाही ? मंदिरे श्रीमंत होत आहेत ही आनंदाची बाब आहे; मात्र या श्रीमंत मंदिरांपैकी अनेक मंदिरे आज सरकारच्या ताब्यात आहेत. या मंदिरांत भक्तांनी श्रद्धेने दिलेले धन सरकार विविध सरकारी योजनांकरिता हवे तसे वापरत असते याबाबतची माहिती आज अनेकांना नाही. सरकारच्या ताब्यात असलेल्या अनेक मंदिरांतील भ्रष्टाचाराची प्रकरणेही एकामागोमाग उघडकीस आली आहेत. जनतेच्या सुविधा, विकासकामे आणि सरकारी योजना यांसाठी जनतेकडून कररूपाने सरकार दरबारी पैसा जमा होत असतो. याशिवाय विविध वस्तूंवरील आणि सेवांवरील कराच्या रूपानेही सरकारी तिजोरी भरत असते. हे सर्व कमी म्हणून कि काय सरकार भगवंताच्या चरणी अर्पण केलेल्या धनाचाही वापर या सर्वांसाठी करत असते. जनतेला सेवा सुविधा देणे हे मंदिरांचे काम आहे की सरकारचे ? आता तर मंदिरांची भूमी वहिवाटधारकांना देण्याचा आत्मघातकी निर्णय सरकारने घेतला आहे.

भारताच्या कानाकोपर्यात आज लाखो मंदिरे आहेत. पुरातन मंदिरे ही भाविकांची ऊर्जाकेंद्र आहेत. पवित्र अशा भारतभूमीवर आजतागायत अनेक आक्रमकांनी आक्रमणे करून भारताचे वैभव लुटले; मात्र येथील वैभवशाली संस्कृती ते लुटू शकले नाहीत. या लुटीतून मंदिरांनीच आपल्या संस्कृतीचे रक्षण केले आहे. 'आजमितीला अनेक श्रीमंत मंदिरांतील धन हे ठेवीच्या रूपाने बँकेत जमा करून ठेवले जाते. भक्तांनी भगवंताच्या चरणी समर्पित केलेल्या धनाचा विनियोग खरेतर धर्मकार्यासाठी व्हायला हवा. देशभरात अशी अनेक पुरातन मंदिरे आहेत ज्यांचे पुनर्निर्माण अपुऱ्या निधीमुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. बँकेत ठेवीच्या रूपाने ठेवण्यात येणाऱ्या धनाचा वापर अशा पुरातन मंदिरांच्या जीर्णोद्धारासाठी करण्यात यावा हे पुनर्निमणाचे कार्य करतांना पुरातन मंदिरांची संरचना आणि पावित्र्य सुरक्षित राखणेही आवश्यक आहे.

जीर्ण अथवा भग्न स्वरूपातील अनेक मंदिरे आज गावागावांत आहेत. काही समृद्ध गावांनी ग्रामस्थांकडून निधीसंकलन करून अशा मंदिरांचा जीर्णोद्धार केला असला, तरी अनेक मंदिरे आजही दयनीय अवस्थेत आहेत. काही मंदिरे तात्पुरती डागडुजी करून सांभाळली गेली आहेत, तर काही मंदिरांत केवळ उत्सवांपुरती रंगरंगोटी केली जाते. अनेक पुरातन मंदिरांत भाविकांसाठी पेयजल, आसने, छत यांसारख्या मूलभूत सुविधाही नाहीत. पूर्वीच्या काळी समस्त मंदिरे ही समृद्ध होती. मंदिरांच्या अर्थकारणातून शिक्षणव्यवस्था सांभाळली जात होती. पूर्वीची मंदिरे गुरूकुल शिक्षण पद्धती चालवत असत. मंदिरांतील ऋषी मुनी गुरुकुलातील विद्यार्थ्यांना व्यवहारिक ज्ञानासोबत रामायण, महाभारत आदी ग्रंथ, वेद, वेदांग, उपनिषिदे, पुराण यांचे शिक्षण देत असत. मुलांना पहाटे लवकर उठून व्यायामाची सवय लावली जात असे. विविध स्तोत्रे, मंत्र, अभंग त्यांच्याकडून मुखोद्गत करून घेतले जात. स्वावलंबनाचे धडे दिले जात, संपूर्ण अध्ययन काळात अठरा विद्या, चौसष्ट कला शिकवल्या जायच्या. गोपालनाचे आणि गोसंवर्धनाचे महत्व बिंबवून सकल प्राणिमात्राचे जीवन समृद्ध आणि सुसह्य करण्याच्या दृष्टीने प्रशिक्षण दिले जात असे . गुरुकुलात घडलेला विद्यार्थी हा सर्वांगाने आदर्श असाच असे. त्यामुळे सुसंस्कृतता हे भारताचे तत्कालीन प्रमुख वैशिष्ट्य होते. पूर्वीच्या काळी प्रत्येक मंदिरात गोशाळा असे. मंदिरांत येणारे भाविक गाईंना चारा पाणी देऊन त्यांचे पालन पोषण करत असत, त्यामुळे गोमातांना संरक्षणही मिळत असे. वर्तमानात समाजाची नैतिकता कमालीची घसरत चालली आहे. अपहरण, खून, बलात्कार, विनयभंग यांसारख्या घटना पुष्कळ प्रमाणात वाढल्या आहेत. ६ महिन्याच्या बालिकेपासून ८० वर्षाची वृद्धाही वासनांधांच्या दुष्कर्मांना बळी पडू लागल्या आहेत. नातेवाईक, पोलीस, शिक्षक, डॉक्टर यांसारख्यांवर काही वर्षांपूर्वी डोळे झाकून विश्वास ठेवला जात असे अशा व्यक्तीही आज स्त्री अत्याचाराच्या घटनांमध्ये गुन्हेगार म्हणून समोर येऊ लागल्या आहेत. शालेय मुलांच्या दप्तरांमध्ये सिगारेटची पाकिटे, दारूच्या बाटल्या आणि गुटखा तंबाखूच्या पुड्या सापडू लागल्या आहेत. पुण्यातील उदाहरण तर ताजेच आहे. अशावेळी गुरुकुल शिक्षण पद्धतीचे महत्व प्रामुख्याने अधोरेखित होते. गोवंश हत्याबंदी कायदा लागू होऊनही गोहत्या थांबलेल्या नाहीत त्यामुळे गोरक्षणाचा प्रश्नही ऐरणीवर आहे. यासाठी पुन्हा एकदा देशभरातील समस्त मंदिरांनी एकत्र येऊन जीर्ण मंदिरांचा जीर्णोद्धार, प्रत्येक मंदिरात गोशाळा आणि मंदिराला मिळणाऱ्या अर्पणातून व्यावहारिक ज्ञानासोबत धार्मिक ज्ञान देणारे गुरुकुल उभारणे हे उपक्रम हाती घ्यायला हवेत !

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

## गस्त

इंधन भरण्या साठी
ये पोलिस बंदोबस्त
महत्व कामे सोडूनि
पंपावर चालते गस्त

संवेदनशील प्रभाग
हो परिसर वादग्रस्त
भडका उडे कधीही
नागरिक अति त्रस्त

अल्प टंचाई असह्य
मोडून टाकते शिस्त
भरतो आपल टाकी
वागणे माझे बशिस्त

कॅन भरभरून इंधन
घरात ठेवले मदमस्त
ज्वलनशील माणूसा
करा शांतता उध्वस्त

पेटवून देई महागाई
का जीव होई स्वस्त
जरासा भाव वाढता
किती कसे आक्रस्त

शिकवू नंतर जगांस
स्वतास करी दुरूस्त
तुडवडा मानवनिर्मी
रे जबाबदार समस्ते

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# नीटचे वाकडे करणाऱ्यांना योग्य धडा शिकवा...

सद्या देशपातळीवर गाजत असलेल्या नीट पेपरफुटीमुळे शिक्षण व्यवस्थेचे वस्त्रहरण केले आहे. पण ही समस्या केवळ काही भ्रष्ट आरोपींपुरती मर्यादित आहे का ? की यामागे कोचिंग क्लासचा भस्मासूर आणि ढासळलेली सरकारी शिक्षण व्यवस्था जबाबदार आहे ? असा देखील प्रश्न पडतो आहे.

एक देश एक परीक्षा या टॅग लाईनखाली ग्रामीण आणि गरीब विद्यार्थ्यांच्या भविष्याचा बळी दिला गेला आहे. असे म्हणणे चुकीचे ठरु नये नीट परीक्षा हि वैद्यकीय शिक्षण प्रवेशासाठी महत्वाची मानली जाते पेपरफुटीचा गोंधळ हा काही नवा नाही या पूर्वी देखील पेपरफुटी, गुणांचा गोंधळ, प्रश्नपत्रिकेतील चुका, तोतया उमेदवारांकडून परीक्षा असे असंख्य प्रकारचे घोळ शिक्षण क्षेत्रात घडत असतात अनेक विद्यार्थी रात्रंदिवस मेहनत घेवून हि नीट परीक्षा उत्तीर्ण होण्याचे स्वप्न पहात असतात. मात्र या पेपरफुटीमुळे अख्या भविष्याचा चुराडा केला आहे.

या प्रकरणाशी संबंधित असलेल्या आरोपींना शिक्षा होईल, सुटून येतील मात्र प्रश्न उरतो तो या विद्यार्थ्यांचे काय होणारं काही विद्यार्थ्यांनी आत्महत्येसारखा पर्याय निवडल्याचे समोर आले आहे. एकूणचं या यंत्रणेतील त्रुटी शोधून काढणे अपेक्षित आहे. आपल्या देशातील न्यायव्यवस्था पूर्णपणे ढासळेली आहे, विश्वास कमी होतो आहे यातील आरोपींना शिक्षा होईल की नाही हे माहीत नाही मात्र नुकसान हे विद्यार्थ्यांचे झाले असून त्यांच्या भविष्याचा खेळ झाला आहे. स्वप्नांना सुरुंग लागला आहे. बाकी निटचे वाकडे करणाऱ्या योग्य धडा शिकवणे अपेक्षित आहे.

**- राजू जाधव,**
**मांगूर जि. बेळगांव**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## मुख्यमंत्री समृद्ध स्पर्धेत विंग गावाचा खंडाळा तालुक्यात प्रथम क्रमांक

**अक्षराज : सुहास महांगरे**

**दि.२४, विंग (सातारा) :** मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान स्पर्धेत खंडाळा तालुक्यात विंग ग्रामपंचायतीने प्रथम, हरिपूर ग्रामपंचायतीने दुसरा, तर वाघोशी ग्रामपंचायत तृतीय पटकावला आहे. खंडाळा तालुक्यातील ६३ ग्रामपंचायत पैकी १३ ग्रामपंचायतींनी या अभियानात सहभाग घेतला होता. खंडाळा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अनिल वाघमारे यांच्या आव्हानाला प्रतिसाद देत सर्व गावांना लोकसहभाग, स्वच्छता, नाविन्यपूर्ण उपक्रम आणि ग्रामविकासाच्या विविध संकल्पना वर प्रभावी कामे केली होती. दरम्यान १५ दिवसांपूर्वी पालघर जिल्हा येथील गटविकास अधिकारी श्री पारस्कर यांच्या नेतृत्वाखाली पथकाने गावांची पाहणी करून गुण दिले होते. त्यानुसार विंग हरिपूर आणि वाघोशी ग्रामपंचायतनी यांनी बाजी मारली. या स्पर्धेत विंग ग्रामपंचायतिने प्रथम क्रमांक पटकावत १५ लाखाचे तर हरिपूर ग्रामपंचायतीने १० लाखाचे तर वाघोशी ग्रामपंचायतीने ८ लाखाचे बक्षीस मिळवले आहेत. वरील तिन्ही गावाची जिल्हा तपासण्यासाठी निवड झाली आहे. आवश्यक ग्रामपंचायत ८ लाखाचे बक्षीस मिळवले आहेत. या गावांची आता जिल्हास्तरीय स्पर्धेमध्ये निवड झाली आहे.

त्यासाठी सातारा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सीईओ याशनी नागराजन तसेच जिल्हा परिषदेचे सर्व अधिकारी खंडाळा पंचायत समितीचे गट विकास अधिकारी वर्ग १ आदरणीय अनिल वाघमारे खंडाळा पंचायत समितीचे सर्व अधिकारी तसेच ग्रामपंचायत विंग चे प्रशासकीय अधिकारी सरपंच उपसरपंच व सर्व सदस्य, ग्राम विकास अधिकारी, तलाठी, जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा विंग व तळेकर वस्ती मुख्याध्यापक व त्यांचे सर्व सहकारी शिक्षक, उपकेंद्र विंग सर्व अधिकारी आरोग्य सेविका आशा वर्कर, अंगणवाडी सेविका, मदतनीस, कृषी, पशुवैद्यकीय अधिकारी, पोलीस पाटील,महिला बचत गटाच्या उमदे च्या सर्व महिला ग्रामपंचायत कर्मचारी, कोतवाल, सर्व ग्रामस्थ, महिला, तरुण वर्ग यांच्या सर्वांच्या सहकार्यातून आपल्या ग्रामपंचायत विंग गावाने मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानमध्ये आपल्या गावाचा पहिला नंबर आल्यबदल खुप खुप अभिनंदन...

## डिझेल मिळवण्यासाठी आता ७/१२ व आधारकार्ड बंधनकारक

### प्लास्टिक बाटलीत पेट्रोल-डिझेल दिल्यास कारवाईचा इशारा

**अक्षराज : जाफर शेख**




**दि.२४, परभणी :** शेतीच्या पूर्वमशागत सुरू असताना डिझेल उपलब्धतेचा प्रश्न निर्माण होत असल्याने शेतकऱ्यांची गैरसोय टाळण्यासाठी पुरवठा विभागाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. आता पेट्रोल पंपावर शेतकऱ्यांना ७/१२ व आधार कार्ड दाखवल्यानंतरच डिझेल उपलब्ध करून देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, शेतकऱ्यांना शेतीच्या कामासाठी १०० लिटरपर्यंत डिझेल उपलब्ध करून देण्याच्या सूचना संबंधित विभागाकडून देण्यात आल्या आहेत. शेतीच्या पूर्वमशागतीची कामे वेगाने सुरू असल्याने शेतकऱ्यांना डिझेलची अडचण निर्माण होऊ नये, यासाठी पुरवठा विभागाने हे आदेश जारी केले आहेत. तसेच, सुरक्षा व नियमांचे पालन करण्यासाठी प्लास्टिकच्या बाटलीत पेट्रोल अथवा डिझेल देण्यात आल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही प्रशासनाकडून देण्यात आला आहे. या निर्णयामुळे गरजू शेतकऱ्यांना दिलासा मिळणार असून शेतीची कामे वेळेत पूर्ण करण्यास मदत होणार आहे.

## परभणी जिल्हा अमली पदार्थमुक्त करण्याची मागणी; सामाजिक कार्यकर्ते कादर यांचे जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन



**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.२४, परभणी :** परभणी शहरासह जिल्ह्यात वाढत चाललेल्या अमली पदार्थांच्या विक्री व सेवनामुळे युवकांचे भविष्य धोक्यात आले असून, जिल्हा अमली पदार्थमुक्त करण्यासाठी कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सय्यद कादर यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे केली आहे. शहरातील विविध भागांमध्ये खुलेआम अमली पदार्थांची विक्री सुरू असल्याची चर्चा नागरिकांमध्ये असून, अनेक तरुण या व्यसनाच्या आहारी जात असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. विशेषतः शाळा, महाविद्यालय परिसर तसेच काही गर्दीच्या भागात गांजा, आरएमडी व इतर नशेच्या पदार्थांची विक्री होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. यामुळे युवकांचे आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक जीवन धोक्यात येत असून गुन्हेगारी प्रवृत्तीला देखील खतपाणी मिळत असल्याची चिंता व्यक्त करण्यात आली आहे. जिल्हा पोलिसांनी विशेष मोहीम राबवून अमली पदार्थ विक्रेत्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी सय्यद कादर यांनी केली आहे. तसेच नागरिकांनीही पुढे येऊन पोलिसांना सहकार्य करावे व अमली पदार्थ विक्रीची माहिती तात्काळ प्रशासनाला द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. जिल्ह्यात अमली पदार्थांविरोधात जनजागृती मोहीम राबवून युवकांना व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज व्यक्त होत आहे.

## ठाण्याच्या जलपरी स्वराने गाजवला समुद्री पराक्रम

**अक्षराज : विकास दळवी**



**दि.२४, ठाणे :** ठाण्यातील १९ वर्षीय जलतरणपटू स्वरा संदेश सावंत हिने अरबी समुद्रात ४० किलोमीटर अंतर अखंड पोहत उल्लेखनीय कामगिरी करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. गेट वे ऑफ इंडिया ते ट्रॉम्बे जेट्टी आणि पुन्हा गेट वे ऑफ इंडिया असा आव्हानात्मक समुद्र प्रवास स्वराने अवघ्या ९ तास ३९ मिनिटांत पूर्ण केला. या समुद्र मोहिम दरम्यान स्वराला उंच लाटा, जोरदार वारे तसेच भरती-ओहोटीच्या वेगवान प्रवाहांचा सामना करावा लागला. समुद्रातील कठीण परिस्थितीतही तिने आत्मविश्वास, जिद्द आणि चिकाटीच्या बळावर ही मोहीम यशस्वीरीत्या पूर्ण केली. विशेष म्हणजे, अल्ट्रा-डिस्टन्स समुद्र पोहण्याचा हा तिचा पहिलाच प्रयत्न होता. स्वरा ही रूपाली रेपाळे स्विमिंग अकादमीमध्ये प्रशिक्षण घेत असून रामचंद्र ठाकूर जलतरण तलावात नियमित सराव करते. वयाच्या दहाव्या वर्षापासून पोहण्यास सुरुवात केलेल्या स्वराने अनेक राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय स्पर्धांमध्येही उल्लेखनीय यश मिळवले आहे. कोची येथे झालेल्या १६.१ किलोमीटर नॅशनल स्विमथॉन स्पर्धेत तिने द्वितीय क्रमांक पटकावला होता. महाराष्ट्र राज्य हौशी जलतरण संघटनेच्या मार्गदर्शनाखाली स्वराने ही उल्लेखनीय समुद्री कामगिरी पूर्ण करत ठाण्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

## बेजबाबदार ठेकेदाराला मनसेचा दणका ;अवघ्या दोन तासात फुटलेली पाईपलाईन दुरुस्त

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.२४, गुहागर :** गुहागर येथे भूमिगत केबलचे खोदाईचे काम सुरु असताना शहरानजिक असणाऱ्या नागरी वस्तीला पाणी पुरवठा करणारी पाईपलाईन फुटल्याने पाणीपुरवठा पूर्णपणे खंडित झाल्याने सदर घटनेने ठेकेदाराचे बेजबाबदारपणा समोर आले आहे.



एचपी गॅस गोडाऊन ते जीवन शिक्षण शाळा दरम्यान जेसीबीमुळे फुटलेली पाणीपुरवठा पाईपलाईन समाजसेवक तसेच मनसेचे गुहागर तालुका सचिव प्रशांत साटले यांच्या तत्परतेमुळे अवघ्या दोन तासांत दुरुस्त करण्यात आली. मे महिन्याचे दिवस, लग्नकार्ये निमित्त गावात आलेले पाहुणे मंडळी ही वस्तुस्थिती बाब लक्षात घेता यामुळे नागरिकांची होणारी मोठी गैरसोय टळली आहे.दिनांक २० मे २०२६ रोजी भूमिगत केबलचे काम सुरू असताना पाणीपुरवठा करणारी पाईपलाईन फुटली.परिणामी २१ मे रोजी संबंधित प्रभागात पाणीपुरवठा पूर्णपणे खंडित झाला होता. मे महिना असल्याने गावात मुंबईकर आणि विविध कार्यक्रमांमुळे पाहुण्यांची मोठी रेलचेल आहे. पाणी न आल्यामुळे मनसेचे गुहागर तालुका सचिव प्रशांत साटले यांनी तातडीने प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी केली. त्यांनी संबंधित ठेकेदाराला बेजबाबदारपणाबद्दल कडक शब्दांत विचारणा करत धारेवर धरले.

**प्रशासनाला पाचारण !**

त्याचबरोबर नगरपंचायत प्रशासकीय अधिकाऱ्यांना तात्काळ घटनास्थळी बोलावून प्रत्यक्ष परिस्थिती दाखवून दिली. प्रशांत साटले यांच्या दबावानंतर प्रशासनाने तातडीने दुरुस्तीचे काम हाती घेतले. मागील एक दिवस रखडलेले काम मनसेचे गुहागर तालुका सचिव प्रशांत साटले यांनी अवघ्या दोन तासांत पूर्ण करून घेतले. साटले यांच्या कृतिशील प्रयत्नाने पाणीपुरवठा सुरळीत झाल्याने नागरिकांनी प्रशांत साटले यांचे आभार मानले आहेत.तर नगरपंचायतीने सदर कामी चांगल्याप्रकारे सहकार्य केल्याबद्दल प्रशांत साटले यांनी संबंधित प्रशासनचे आभार मानले आहे.

## शरद पवार राष्ट्रवादी पक्षाची पेणमध्ये जिल्हा कार्यकारिणी बैठक




**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.२४, पेण (रायगड) :** रायगड जिल्हा दौऱ्यावर असलेल्या राष्ट्रवादी शरद पवार गट पक्षाचे खासदार सुरेश बाळ्या मामा म्हात्रे हे रायगड जिल्ह्याचे संपर्क प्रमुख पदाची जबाबदारी निभावताना नुकतेच साई सहारा हॉटेल सभागृहात झालेल्या बैठकीत पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांना संबोधित करताना पक्ष संघटना मजबूतीकरण स्थानिक समस्या याबाबत बहूमोल मार्गदर्शन करताना पक्षातील जुन्या कार्यकर्त्यांना संघटनेचे पद देऊन यूवा महिला व प्रमुख कार्यकारणीत नेमणूक करण्याबाबत जिल्हाभरातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांना संबोधीत करताना भेडसावत असणा-या प्रमुख समस्यांबाबत खासदार सुरेश तथा बाळ्या मामा म्हात्रे पक्ष संघटना मजबूतीकरण याबाबत महत्वाच्या सूचना ही बैठकीत दिल्या.

यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना महाड चवदार तलावातील पाणी शुद्धीकरणाचा प्रश्न मार्गी लागला असून तलावातील पाणी शुद्धीकरणासाठी शासनाने निधी उपलब्ध करून दिल्याचे सांगितले. राष्ट्रवादीमधे तटकरे आणि पटेल याची कोंडी केली जाते याबाबत हा त्यांचा पक्षाचा अंतर्गत मामला आहे.पण कोंडी झाली आहे हे मान्य करावे लागेल.

पत्रकारांनी विचारलेल्या टोल आकारणी नवी मुंबई विमानतळाला दि.बा पाटील याचे नाव या प्रश्नांना समर्पक उत्तरे देताना ते म्हणाले रायगड जिल्ह्यातील सर्व वाहनांना टोल माफी मिळालीच पाहिजे यासाठी जनतेने आंदोलन करावे मी जातीने उपस्थित राहून सरकारला टोल आकारणीचा निर्णय रद्द करण्यास भाग पाडू.तटकरे शरद पवार साहेबांना भेटले नेमकं काय प्रकरण आहे शरद पवार साहेबांना पक्षाचे इतर पक्षातील नेते नेहमी भेटतात पण तटकरे का भेटले याबाबत मला माहित नाही पण एवढं मात्र निश्चित माहिती आहे शरद पवार सिर्फ नाम ही काफी है त्यामुळे त्यांना राष्ट्रवादीचे सुनील तटकरे काय किंवा अन्य पक्षातील नेते येत असतात भेट घेत असतात. याशिवाय नवी मुंबई विमानतळाला आदरणीय लोकनेते दि.बा पाटील यांच्या नाव देण्याबाबत विचारलेल्या प्रश्नाला ही प्रक्रिया सुरू असून यासाठी आम्ही प्रयत्नशील असल्याचे सांगत आमचा अट्टाहास सुरूच राहणार आहे. रायगड जिल्ह्यात पक्ष मजबूती करण्यात जिल्हा अध्यक्ष रविंद्र चव्हाण व सर्व सहकारी पदाधिकारी कार्यकर्ते यांना पक्षाच्या वतीने मी भरीव सहकार्य करणार असल्याचे सांगितले.पत्रकारांशी मनमोकळेपणे संवाद साधताना त्यांनी सर्व प्रश्नांची मनमोकळेपणाने समर्पक उत्तरे दिली.

रायगड जिल्हा दौऱ्यावर असताना सायंकाळी साडेपाच वाजता पेण येथील मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील साई सहारा हॉटेल सभागृहात ही बैठक रायगड जिल्हा अध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी आयोजित केली होती. यावेळी जिल्ह्यातील राष्ट्रवादी शरद पवार गट पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते. पेण तालुका अध्यक्ष प्रकाश मोकल यांनी शेवटी आभार मानले.

## भिवंडीकरांची वाहतूक कोंडीतून सुटका; काल्हेर-ताडाळी पाईपलाईन रस्त्याचे उद्घाटन

**अक्षराज : रविंद्र खाडे**

**दि.२४, शहापूर (ठाणे) :** भिवंडीतील काल्हेर ते ताडाळी पाईपलाईन काँक्रीट रस्त्याचे उद्घाटन खासदार सुरेश म्हात्रे यांच्या हस्ते रविवारी पार पडले. या रस्त्यामुळे अंजुर फाटा-काल्हेर ते ठाणे मार्गावरील वाहतूक कोंडीतून नागरिकांची मोठी सुटका होणार असल्याची भावना स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली.

> या रस्त्यासाठी आम्ही अनेक वर्षे पाठपुरावा केला. काहींनी केवळ श्रेय घेण्याचे काम केले. आता हा रस्ता पूर्ण झाल्याने भिवंडीकरांची वाहतूक कोंडीतून निश्चितच सुटका होईल.
>
> **– खासदार सुरेश म्हात्रे**

अंजुर फाटा, काल्हेर ते ठाणे मार्गावर मोठ्या प्रमाणावर गोडाऊन तसेच अरुंद रस्ते असल्याने नेहमीच वाहतूक कोंडी होत असते. अनेकदा नागरिकांना दोन ते अडीच तास वाहतूक कोंडीत अडकून राहावे लागत होते. त्यामुळे काल्हेर ते ताडाळी हा पर्यायी रस्ता भिवंडीकरांसाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जात होता. मात्र मागील पंचवीस वर्षांपासून या रस्त्याची दुरवस्था झाल्याने वाहन चालकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत होते.

या रस्त्याच्या काँक्रिटीकरणासाठी खासदार सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा यांनी राज्य शासन, बृहन्मुंबई महानगरपालिका आणि एमएमआरडीए प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. निधी मंजूर झाल्यानंतर माजी खासदार तथा माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांच्या हस्ते कामाचा



शुभारंभ झाला होता. मात्र रस्त्यासाठी आपणच सातत्याने पाठपुरावा केल्याचा दावा करत खासदार म्हात्रे यांनी दुसऱ्याच दिवशी या रस्त्यावर गोमूत्र शिंपडून पुन्हा उद्घाटन केले होते. अखेर रविवारी हा रस्ता अधिकृतपणे वाहतुकीसाठी खुला करण्यात आला.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे युवा कार्यकर्ते सुमित म्हात्रे यांनीही या रस्त्यासाठी विविध प्रशासन स्तरांवर सातत्याने पाठपुरावा केल्याचे सांगत, मागील पंचवीस वर्षांचा प्रश्न अखेर मार्गी लागला, असे मत व्यक्त केले.

## गुणवंत विद्यार्थ्यांच्या सन्मान सोहळ्यात विद्यार्थ्यांना प्रेरणेची नवी दिशा मिळेल : आ.जोरगेवार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२४, चंद्रपूर :** आ. किशोर जोरगेवार यांच्या पुढाकारातून तसेच अम्मा की पढ़ाई उपक्रमाच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांच्या सन्मान सोहळ्याचे आयोजन उत्साहात पार पडले. या कार्यक्रमात इयत्ता १० वी व १२ वी परीक्षेत ७५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण प्राप्त करणाऱ्या तसेच जेईई परीक्षेत प्राविण्य मिळविणाऱ्या ६९३ विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला.

यावेळी आ. किशोर जोरगेवार, यजुर्वेद महाजन, भारतीय जनता पार्टीचे माजी महानगराध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, अम्मा की पढ़ाई फाउंडेशनचे चंदू वासाडे, नामदेव डाहुले, महामंत्री सविता दंढारे, रविंद्र गुरनुले, वंदना हातगावकर, बलराम डोडाणी, नगरसेविका सविता कांबळे, सरला कुळसंगे, आशा देशमुख, शीतल गुरनुले, नगरसेवक जितेश कुळमेथे, वंदना तिखे, अरुण तिखे, निलेश बेलखेडे,




संजय बुरघाटे, सुमित बेले, प्रलय मशाखेत्री आदींची उपस्थिती होती.

कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून आंतरराष्ट्रीय वक्ते, महाराष्ट्रियन ऑफ द इयर पुरस्कार २०२५ सन्मानित तसेच राष्ट्रीय विज्ञान व तंत्रज्ञान समिती, राष्ट्रीय मानवाधिकार आयोग, भारत सरकार यांचे सदस्य यजुर्वेद महाजन उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, यश मिळवण्यासाठी मोठी स्वप्ने पाहणे गरजेचे आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी कोणत्याही क्षेत्रात जागतिक स्तरावर यश मिळवू शकतात. त्यासाठी जिद्द, सातत्य आणि आत्मविश्वास असणे आवश्यक आहे. मोबाईल आणि सोशल मीडियाचा योग्य वापर करून ज्ञान मिळवा, वेळेचे व्यवस्थापन शिका आणि अपयशाला घाबरू नका. प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये काहीतरी वेगळे करण्याची क्षमता आहे, असे ते यावेळी म्हणाले.

यावेळी बोलताना आ. किशोर जोरगेवार म्हणाले की, गुणवंत विद्यार्थी हे केवळ आपल्या कुटुंबाचे नव्हे, तर संपूर्ण चंद्रपूर जिल्ह्याचे, महाराष्ट्राचे आणि देशाचे भविष्य आहेत. स्थानिक विद्यार्थ्यांच्या यशाचा गौरव होताना पाहणे ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. विद्यार्थ्यांना योग्य दिशा, प्रेरणा आणि संधी मिळावी यासाठी अशा उपक्रमांचे आयोजन सातत्याने करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहून कठोर परिश्रमाच्या जोरावर यश संपादन करावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

# शस्त्रक्रियेदरम्यान रक्तवाहिन्या सील करून रक्तस्राव थांबविणारे उपकरण केईएम हॉस्पिटलमध्ये उपलब्ध

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२४, मुंबई :** राज्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम आणि सर्वसामान्यांना दर्जेदार उपचार मिळावेत या उद्देशाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. मुंबईतील सेठ जीएस मेडिकल कॉलेज आणि केईएम हॉस्पीटल येथे अत्याधुनिक 'हाय-एंड व्हेसल सीलर' (Vessel Sealer) उपकरणे उपलब्ध करून देण्यात आली असून, यामुळे शस्त्रक्रियांच्या गुणवत्तेत मोठी सुधारणा होणार आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील रुग्णांना अत्याधुनिक उपचार सुविधा मिळणार आहेत.

या सीएसआर प्रकल्पांतर्गत दोन प्रगत इलेक्ट्रोसर्जिकल युनिट्स जनरल सर्जरी विभागासाठी 'इलेक्टिव्ह सर्जरी ओटी' जमेशदजी मेहता शस्त्रक्रिया




कक्षामध्ये बसविण्यात आले आहेत.

केईएम रुग्णालय हे मुंबईतील सर्वात मोठ्या सार्वजनिक आरोग्य संस्थांपैकी एक असून येथे दररोज हजारो गरजू रुग्ण उपचारासाठी येतात. अशा परिस्थितीत अत्याधुनिक उपकरणांची गरज अत्यंत महत्त्वाची होती. नव्याने बसविण्यात आलेली ही उपकरणे शस्त्रक्रियेदरम्यान रक्तस्राव नियंत्रणासाठी उपयुक्त ठरणार असून रक्तवाहिन्या सील करून रक्तस्राव त्वरित थांबवण्यास मदत करतात.

या उपकरणांमुळे शस्त्रक्रियेची अचूकता वाढेल, गुंतागुंत कमी होईल आणि रुग्णांच्या सुरक्षिततेत मोठी वाढ होईल. विशेषतः जटिल शस्त्रक्रियांमध्ये रक्तस्राव कमी होऊन डॉक्टरांना अधिक कार्यक्षमतेने उपचार करता येणार आहेत. या उपक्रमासाठी इंडियन ऑइल कंपनीने सहकार्य केले आहे त्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आभार व्यक्त केले आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत सांगितले की, राज्यातील प्रत्येक नागरिकाला गुणवत्तापूर्ण आणि अत्याधुनिक आरोग्य सेवा मिळणे ही सरकारची प्राथमिकता आहे. अशा प्रकल्पांमुळे सार्वजनिक रुग्णालयांची क्षमता वाढून गरजू रुग्णांना मोठा दिलासा मिळतो. या उपक्रमामुळे केवळ आरोग्य सेवेची गुणवत्ता उंचावणार नाही, तर गरीब आणि वंचित घटकांसाठी आधुनिक वैद्यकीय सुविधांचा मार्गही अधिक सुलभ होणार आहे.

# धानिवरी दुर्घटना; १३ निष्पाप आदिवासींचा बळी की प्रशासनाच्या निष्काळजीपणाचा परिणाम?

## अपघातग्रस्त कुटुंबीयांच्या मदतीला काँग्रेस; दोन मुलींच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारली

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.२४, डहाणू (पालघर) :** पालघर जिल्ह्यातील डहाणू तालुक्यातील धानिवरी गावाजवळ मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील (NH-48) भीषण अपघातानंतर संपूर्ण परिसरात शोककळा पसरली असून प्रशासन आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विरोधात संतापाची लाट उसळली आहे. दिनांक १८ मे रोजी सायंकाळच्या सुमारास बापूगाव येथील आदिवासी समाजातील नागरिक साखरपुड्याच्या कार्यक्रमासाठी जात असताना त्यांच्या वाहनाला भरधाव कंटेनरने जोरदार धडक दिली.

या दुर्घटनेत १३ निष्पाप नागरिकांचा जागीच मृत्यू झाला, तर पाच जण गंभीर जखमी झाले. या पार्श्वभूमीवर दिनांक २३ मे रोजी पालघर जिल्हा काँग्रेसच्या नेतृत्वाखाली अपघातग्रस्त भागाला भेट देण्यात आली. पालघर जिल्हा काँग्रेस अध्यक्ष सत्यम ठाकूर, डहाणू तालुका अध्यक्षा वर्षा वायेडा, आदिवासी सेल अध्यक्ष राहुल पाचाळकर, सामाजिक कार्यकर्ते भरत वायेडा तसेच अन्य पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी लाखतपाडा येथे जाऊन मृतांच्या कुटुंबीयांची भेट घेत सांत्वन केले. यावेळी अत्यंत हृदयद्रावक वास्तव समोर आले. अपघातात वडिलांना गमावलेल्या तिसरी आणि चौथीत शिकणाऱ्या दोन चिमुकल्या मुलींच्या शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी काँग्रेस पक्षाकडून बारावीपर्यंत स्वीकारण्यात आल्याची घोषणा करण्यात आली. यासाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्याशीही चर्चा करण्यात आल्याचे सांगण्यात आले. तसेच ३१ मे रोजी होणाऱ्या अंतिम विधीसाठी आवश्यक मदतही उपलब्ध



करून देण्यात आली. यानंतर काँग्रेसच्या प्रतिनिधी मंडळाने प्रत्यक्ष अपघात स्थळाची पाहणी केली. स्थानिक ग्रामस्थांनी प्रशासन व NHAI च्या निष्काळजी कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त करत सुरक्षित सर्व्हिस रोड असता, तर आज १३ जीव वाचले असते, असा संतप्त सवाल उपस्थित केला. स्थानिकांसाठी सुरक्षित मार्ग उपलब्ध नसल्याने नागरिकांना जीव धोक्यात घालून महामार्गाच्या चुकीच्या दिशेने प्रवास करावा लागत असल्याची गंभीर बाबही समोर आली.

हा केवळ अपघात नसून निष्काळजी व्यवस्थेमुळे झालेला सामूहिक बळी आहे, अशी भावना आता संपूर्ण परिसरातून व्यक्त होत असून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी अधिक तीव्र होत आहे. काँग्रेस पक्ष या न्यायलढ्यात गावकऱ्यांसोबत कायम उभा राहील, असे आश्वासन सत्यम ठाकूर यांनी यावेळी दिले.

# विश्वमंगल मराठी फाउंडेशन आयोजित संवाद बैठक पंढरपूर येथे संपन्न

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२४, पंढरपूर :** आयोजित संवाद बैठक पंढरपूर येथे उत्साहात संपन्न झाली. मराठी भाषा, संस्कृती, शिक्षण, उद्योग व सामाजिक विकास या विविध विषयांवर बैठकीत सखोल चर्चा करण्यात आली.बैठकीच्या प्रस्ताविकात फाउंडेशनचे मुख्य समन्वयक विजय पाटील यांनी विश्वमंगल मराठी फाउंडेशनच्या स्थापनेमागील उद्देश स्पष्ट केला. मराठी भाषिक व्यावसायिकांना एकत्र आणणे, मराठी भाषा व संस्कृतीचे जतन-संवर्धन करणे आणि लोकमंगल ते विश्वमंगल हा प्रवास कशा पद्धतीने घडला याविषयी त्यांनी माहिती दिली. तसेच आ.सुभाष बापू देशमुख यांच्या सामाजिक कार्याची मांडणी यावेळी केली.१६ देशांमध्ये वास्तव व विविध क्षेत्रातील अनुभव असलेले सुरेश देशमुख यांनी फाउंडेशनच्या संघटनात्मक रचनेबाबत माहिती दिली. राज्य, जिल्हा, तालुका आणि गाव पातळीवर समित्या गठीत करून विश्वमंगलची चळवळ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.यावेळी भूषण कुलकर्णी यांनी विश्वमंगल बिझनेस नेटवर्क अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या विश्वमंगल बिझनेस डेव्हलपमेंट फोरम विषयी माहिती दिली. ग्रामीण भागातील उद्योजक, व्यापारी



व व्यवसायिकांना एकत्र आणून परस्पर सहकार्य, उद्योगवाढ, मार्केटिंग, चर्चासत्रे आणि मार्गदर्शनाच्या माध्यमातून व्यवसाय वृद्धीसाठी काम करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. एकमेका सहाय्य करू, अवघे होऊ श्रीमंत हे ध्येय समोर ठेवून फोरम कार्य करणार असल्याचे त्यांनी नमूद केले. पंढरपूरमध्ये या फोरमची पहिली शाखा सुरू करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला.अजित कंडरे येलमार यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळांच्या सुधारणा उपक्रमाविषयी माहिती दिली. गुणवत्तापूर्ण शिक्षण, भौतिक सुविधा, लोकसहभाग आणि दानशूर व्यक्तींच्या माध्यमातून शाळा सक्षम करण्यासाठी विश्वमंगल ज्ञानमंदिर सुधारणा कार्यक्रम राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. राज्यातील १००० शाळांच्या सुधारणेचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले असल्याची माहिती त्यांनी दिली.गणेश पाटील यांनी सोलापूर सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून करण्यात आलेल्या विविध सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रमांची माहिती दिली. भंडीशेगाव येथे ४२ एकर परिसरात २० हजार झाडांची लागवड, चिंचणी येथील ग्रामीण कृषी पर्यटन केंद्र, सरकोली पर्यटन केंद्र, भालेवाडी एकात्मिक पर्यटन केंद्र अशा विविध प्रकल्पांचा उल्लेख त्यांनी केला. राज्य, देश आणि विदेश स्तरावर कार्य विस्तारासाठी विश्वमंगल मराठी फाउंडेशनची स्थापना करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष सुभाष बापू देशमुख यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, पांडुरंगाच्या आशीर्वादाने १ मे रोजी आळंदी येथे विश्वमंगलची स्थापना करण्यात आली. सकारात्मक विचार, सामाजिक बांधिलकी आणि लोकसहभागाच्या माध्यमातून गाव, जिल्हा व राज्य विकासासाठी सर्वांनी एकत्र काम करण्याचे आवाहन त्यांनी केले.सरकोली, चिंचणी, भालेवाडी, भेंड, भंडीशेगाव, चिनके आणि वाडीकुरोली यांसारखी गावे जागतिक स्तरावर पोहोचविण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच मराठी व्यवसाय, मराठी भाषा आणि संस्कृतीचे जतन व संवर्धन करण्यासाठी विविध सांस्कृतिक, शैक्षणिक आणि व्यावसायिक उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले.यावेळी प्रत्येकाने आपल्या जिल्हा परिषद शाळेचे पालकत्व स्वीकारून शाळा सुधारणा मोहिमेत सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले. विदेशात कार्यरत असलेल्या मराठी बांधवांना गाव विकासासाठी जोडण्याचे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले. विशेष म्हणजे, पंढरपूर बिझनेस डेव्हलपमेंट फोरमची अधिकृत स्थापना यावेळी करण्यात आली. विविध क्षेत्रातील ४० व्यावसायिकांचा फोरम तयार करण्यात आला असून, तचइछ अप्लिकेशनच्या माध्यमातून सर्व व्यवसायिकांना एकत्र जोडले जाणार आहे. व्यवसाय वाढ, परस्पर सहकार्य, मार्केटिंग नियोजन, देवाणघेवाण आणि साप्ताहिक बैठकींच्या माध्यमातून नेटवर्क अधिक सक्षम करण्याबाबत चर्चा करण्यात आली. यावेळी भूषण कुलकर्णी सुरेश देशमुख, अजित कंडरे, अनंता चव्हाण, मोहन अनपट, समाधान काळे, शशिकांत कराळे, विलास भोसले, श्रीकांत दवले, संतोष दळवी, सुभाष खटावकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थिती होते, यावेळी सूत्रसंचालन भीमाशंकर कुंभार यांनी केले.

# अंकुर शिबिरातील विद्यार्थ्यांची घोडाझरी अभयारण्य व अड्याळटेकडी येथे शैक्षणिक सहल

**अक्षराज : नितेश पाटील**

**दि.२४, चिमूर (चंद्रपूर) :** ब्राईट एज फाउंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेले अंकुर हे ११ वर्ष वयोगटातील मुला-मुलींसाठीचे २० दिवसांचे निवासी शिबिर सध्या उत्साहात सुरू आहे. दिनांक ११ मे ते ३० मे २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात निवड झालेल्या ८० विद्यार्थ्यांचा सहभाग आहे. गेल्या पाच वर्षांपासून हा उपक्रम सातत्याने राबविण्यात येत असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तो प्रभावी ठरत आहे.

या शिबिरामध्ये विद्यार्थ्यांना गणित, भाषा आणि इंग्रजी विषयांचे मार्गदर्शन करून नवोदय परीक्षेची तयारी करून घेतली जाते. यावेळी गणित विषयाचे मार्गदर्शन सुपर सिक्स अकॅडमीचे संचालक विनोद जांभुळे यांनी ऑनलाइन पद्धतीने केले. तसेच संबंधित विषयांचा गृहपाठ, प्रश्नपत्रिका सोडविणे, वर्षभर ऑनलाइन वर्ग व ऑनलाइन चाचण्या यांचेही आयोजन करण्यात येते. विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, चिकित्सक वृत्ती, संवाद कौशल्य, जिज्ञासा, संवेदनशीलता, सामाजिक भान, आध्यात्मिक जाणीव, बौद्धिक विकास, आजीवन शिक्षणाची प्रेरणा आणि वैश्विक मानवी मूल्ये रुजविण्यासाठी विविध उपक्रम राबविले जातात.

या मूल्यसमूहाला C5S3ILU असे नाव देण्यात आले आहे. या शिबिरांतर्गत रविवार, दिनांक २४ मे २०२६ रोजी विद्यार्थ्यांसाठी घोडाझरी अभयारण्य तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि ग्रामगीताचार्य तुकाराम दादा यांच्या कर्माने पावन झालेल्या अड्याळटेकडी येथे शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले होते.

या सहलीदरम्यान विद्यार्थ्यांना निसर्ग, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक मूल्यांची माहिती देण्यात आली. झेप संस्था नागभीडचे पर्यावरण मित्र क्षितिज गरमळे, गुलाब राऊत आणि विरू गजबे यांनी विद्यार्थ्यांना जंगल परिसंस्था, जैवविविधता, वन्यजीव संरक्षण आणि पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व याविषयी अतिशय समर्पक आणि प्रेरणादायी माहिती दिली. विद्यार्थ्यांनीही मोठ्या उत्सुकतेने विविध प्रश्न विचारत संवाद साधला. या सहलीदरम्यान तुकूम गावातील समाज बांधवांनी विद्यार्थ्यांसाठी अत्यंत आत्मीयतेने व प्रेमपूर्वक जेवणाची उत्कृष्ट व्यवस्था केली. ग्रामीण भागातील माणुसकी, सहकार्यभाव आणि सामाजिक बांधिलकीचे सुंदर दर्शन विद्यार्थ्यांना या माध्यमातून अनुभवायला मिळाले.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी अंकुर संयोजक विवेक चौके, आशिष रंदये, वंदना हनवते, मॅजिक विद्यार्थी आशिष चौखे, सुरज नारनवरे, ममता जीवतोडे, ज्ञानेश्वर मगरे, मनीषा मगरे, स्वप्निल जांभूळे, नामदेव घोडमारे ,विलास चौधरी वाल्मीक नन्नवरे स्वयंसेवक संतोषी मानकर, नुपूर ननावरे, मृणाली चौधरी, अंतरा जांभुळे, श्री.चौके यांनी विशेष सहकार्य केले.

## थोडक्यात

# भाजप शिक्षक आघाडीला मुख्यमंत्र्यांचे आश्वासन

**अक्षराज : दिवाकर घेर**



**दि.२४, नागपूर :** भाजप शिक्षक आघाडी पूर्व विदर्भाचे अध्यक्ष अनिल महादेवराव शिवणकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची नागपूरच्या रामगिरी बंगल्यावर प्रत्यक्ष भेट घेत शिक्षण क्षेत्रातील अनेक ज्वलंत विषयावर सकारात्मक चर्चा केली व निवेदन दिले त्यावर मुख्यमंत्र्यांनी सर्व विषय निकाली काढण्याचे आश्वासन दिले.

निवेदनात शालेय शिक्षण विभागाच्या ११ मे २०२६ च्या शासन पत्रा अन्वये ग्रामीण व दुर्गम भागातील इयत्ता ९ व १० वीच्या दोन्ही वर्गाची एकत्रित पटसंख्या २० असल्यास ३ शिक्षक अनुज्ञेयतेची सवलत शहरी भागातील शाळांना सुद्धा लागू करून शहरातील मराठी माध्यमाच्या अनुदानित शाळा वाचवण्यात यावा व मराठी माध्यमाच्या शाळा वाचवण्यासाठी स्वतंत्र धोरण निश्चित करावे, विदर्भातील तापमानाचा अंदाज घेता येत्या १५ जूनला शाळा सुरू करणे शक्य नाही म्हणून विदर्भातील शाळा २६ जूनला सुरू कराव्यात, अपंग समावेशित योजना माध्यमिक स्तरातील ९६३ उर्वरित विशेष शिक्षकांचे समायोजन रिक्त पदांवर करण्याचा प्रस्ताव आयुक्ता कार्यालयातून मागवावा, मागील ७५ दिवसापासून आंदोलन करणाऱ्या समग्र शिक्षा अभियानातील ३२०० कर्मचाऱ्यांचे समायोजन आहे त्याच पदावर शालेय शिक्षण विभागात करावे, जनगणनेचे राष्ट्रीय कार्य केल्यामुळे जमा होणाऱ्या अर्जित रजा रोखीकरणाचा शासन निर्णय निर्गमित करावा, राज्यात ४८६० विशेष शिक्षकांची पदे निर्माण झाली असल्यामुळे मागील वीस वर्षापासून मानधनावर कार्यरत कला, क्रीडा, कार्यानुभव, समाजसेवा शिक्षकांना शासन सेवेत समायोजित करावे, मा. उच्च न्यायालयाच्या निर्णया प्रमाणे सर्व पदवीधर शिक्षकांना सरसकट पदवीधर वेतनश्रेणी लागू करण्याचा शासन निर्णय निर्गमित करणे, विद्यार्थ्यांचे गणवेश व पाठ्यपुस्तकांचा वेळेवर पुरवठा या विषयावर अनिल महादेवराव शिवणकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सोबत चर्चा केली. त्यावर मुख्यमंत्र्यांनी वरील सर्व विषय निकाली काढण्याचे आश्वासित केले.

# धानिवरी अपघातग्रस्तांच्या मदतीला राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)

**अक्षराज : निलेश कासट**



**दि.२४, डहाणू (पालघर) :** डहाणू तालुक्यातील धानिवरी येथे वऱ्हाडाच्या वाहनाला झालेल्या भीषण अपघातानंतर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाकडून अपघातग्रस्त कुटुंबीयांच्या मदतीसाठी पुढाकार घेण्यात आला आहे. पक्षाचे पालघर जिल्हाध्यक्ष आनंद ठाकूर यांनी धुंदलवाडी येथील वेदांत रुग्णालयाला भेट देत जखमींची विचारपूस केली.

यावेळी रुग्णालयाचे प्रमुख डॉ. माने यांच्याशी चर्चा करून उपचार घेत असलेल्या आठ जखमी रुग्णांच्या प्रकृतीची माहिती घेण्यात आली. तसेच रुग्णांच्या नातेवाईकांना फळे व पिण्याच्या पाण्याचे वाटप करण्यात आले.

यानंतर आनंद ठाकूर यांनी बापूगाव लाखातपाडा येथे जाऊन अपघातात मृत्यूमुखी पडलेल्या १३ जणांच्या कुटुंबीयांची भेट घेत त्यांचे सांत्वन केले. या भीषण दुर्घटनेमुळे निराधार झालेल्या सहा मुलींच्या शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे स्वीकारण्यात आल्याची घोषणा त्यांनी केली.

दोन लहान मुलींसह नववी, दहावी आणि बारावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या चार मुलींच्या शिक्षणाचा संपूर्ण खर्च पक्ष उचलणार आहे, असे आनंद ठाकूर यांनी सांगितले.

यावेळी त्यांनी महामार्गावरील अपूर्ण सेवा रस्त्यांमुळेच हा अपघात घडल्याचा आरोप करत प्रशासनाने तातडीने सर्व्हिस रोडची कामे पूर्ण करावीत, अशी मागणी केली. गंभीर अवस्थेतील पाच रुग्णांवर मुंबई येथे उपचार सुरू असून त्यांच्या प्रकृतीची सातत्याने माहिती घेत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

या भेटीदरम्यान पक्षाचे उपाध्यक्ष पांडुरंग बेलकर, अशोक भोईर, योगेश बंन, सचिव हरीश मुकणे, कोषाध्यक्ष जितू पटेल, माजी जिल्हा परिषद सदस्य शैलेश करमोडा, तालुका उपाध्यक्ष विलास सुमडा तसेच महिला पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# आदिवासींचे धर्मांतर रोखणे काळाची गरज : मिलिंद परांडे



**अक्षराज : रविंद्र खाडे**

**दि.२४, शहापूर (ठाण) :** ब्रिटिशांविरोधात लढा उभारणारे तसेच प्रसंगी प्राणाची आहुती देणाऱ्या क्रांतिवीर राघोजी भांगरे, बिरसा मुंडा आणि नाग्या कातकरी यांच्या वारसांना ख्रिश्चन मिशनऱ्यांकडून प्रलोभने दाखवून मोठ्या प्रमाणात धर्मांतर केले जात असल्याचा आरोप करत आदिवासींचे होणारे धर्मांतर रोखणे ही काळाची गरज असल्याचे मत विश्व हिंदू परिषदेचे संघटन महामंत्री मिलिंद परांडे यांनी व्यक्त केले.

शहापूर तालुक्यातील चेरवली येथे शनिवारी (दि.२३ मे) आयोजित हिंदू संमेलनात ते बोलत होते. यावेळी त्यांनी देव, देश आणि धर्म रक्षणासाठी देशभरातील विविध जनजाती समाजाच्या नेत्यांनी उभारलेल्या लढ्यांचा उल्लेख करत त्यांच्या कार्याचा वारसा पुढे नेण्याचे आवाहन केले.

सन, उत्सव आणि परंपरा जोपासण्यासाठी जसे सत्संग व विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित केले जातात, तसेच आदिवासी समाजाचे आरोग्य सुदृढ राहावे यासाठी गावागावात आरोग्य शिबिरे, शिक्षण व रोजगाराच्या सुविधा उपलब्ध करून देण्याचे कार्य विभागवार नेमलेल्या धर्मरक्षकांनी करावे, असा सल्लाही परांडे यांनी दिला.

या संमेलनास कोकण प्रांत सहमंत्री अजय मुडपे, विकास मुकाने, कोकण प्रांत धर्मप्रसार सहप्रमुख संदीप भगत, विभाग मंत्री विद्याधर कुंटे, जिल्हा मंत्री वैभव महाडिक, धर्मरक्षक जयवंत ठाकरे, नरसु गावंडा, राम मांजे, शिवराम लखांबरे, किशोर हिवाळे, संजय मुकणे आदी उपस्थित होते.